आर.सी.सी. ९३/२०१३
सरकार वि. मारूती व इतर.
**निशाणी ८२**

**<u>अभियोगपक्षातर्फे सा.क्र. ३ याची जबानी</u>**
**<u>मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,</u>**

माझे नाव – संजय शंकरराव देशमुख, वय – ५५ वर्षे,
व्यवसाय – शेती, राहणार – कोतुळ,
तालुका – अकोले, जिल्हा – अहमदनगर.

**<u>सरतपास अभियोगपक्षातर्फे विशेष सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती. एस. ए. भोसले यांच्या मार्फत</u> –**

१. घटनेच्या अगोदर आमच्यामध्ये व आरोपींमध्ये रस्त्याच्या कारणावरून वाद झाला होता. ते कोर्टात गेले आम्ही कोर्टात गेलो. मारूती देशमुख यांना कोर्टात मनाई हुकूम मिळाला. त्यानंतर दिनांक २८.०२.२०१३ रोजी आमच्या वकीलांनी मनाई हुकूम उठवला.

२. घटना दिनांक ०२.०३.२०१३ रोजी सकाळी १०:०० वाजता आमच्या शेतामध्ये घडली होती. आमच्या ऊसाला तोड आली होती. आरोपींनी रस्त्यात टाकलेल्या काट्या मी व माझे चुलते काढण्यासाठी गेलो होतो. त्यावेळी आरोपी म्हणाले की, काट्या काढायच्या नाही, या रस्त्याने ऊस न्यायचा नाही. आम्ही त्यांना विनंती केली की, आमचा ऊस या रस्त्याने जाऊ द्या. त्यांनी ते मानले नाही. गणेश देशमुख याने माझ्या डोक्यात काठी मारली व सुभाष गोपाळ देशमुख यांच्या डोक्यात मारूती देशमुख यांनी दगड मारला. गणेश देशमुख याने माझ्या उजव्या मांडीला चावा घेतला व उषा मारूती देशमुख यांनी आम्हाला लाथाबुक्यांनी मारहाण केली व शिवीगाळ केली.

३. नंतर आमचे चुलत बंधू रमेश सोपान देशमुख हे गावातून दुध घालून आले व त्यांनी आमची मारामारी सोडवली. त्यांनी मला उठवले. त्यानंतर तो आम्हाला मोटारसायकलने अकोले येथे पोलीस स्टेशनला घेवून

आला. पोलीसांनी आम्हाला सरकारी दवाखान्यात जायला लेखी दिले. सरकारी दवाखान्यात जावून उपचार घेवून आम्ही पोलीस स्टेशनला गेलो व सुभाष देशमुख यांनी फिर्याद दिली. पोलीसांनी माझा जबाब नोंदवला होता. मी आरोपींना ओळखतो. ते आजरोजी न्यायालयात हजर आहेत.

**<u>उलटतपास आरोपींतर्फे विद्वान विधिज्ञ श्री. एस. एच गोंगे यांच्या मार्फत</u> –**

४. मारूती देशमुख हे माझे चुलते असून गणेश देशमुख हा माझा चुलत भाऊ आहे. हे म्हणणे खरे आहे की, जमिनीच्या हद्दीवरून संगमनेर न्यायालयात आमचे तीन दावे चालू आहेत व अकोले कोर्टात एक दावा चालू आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या वडीलांमध्ये व चुलत्यांमध्ये जमिनीचे वाटप झालेले आहे परंतु, त्याची फाळणी झालेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, फाळणी झाली नसल्यामुळे अनेक वर्षापासून आमच्यामध्ये व आरोपींमध्ये हद्दीवरून वाद आहेत. आमच्या सर्व्हे नंबर ८७/१, ८८/८९/२ व ६२ मध्ये ऊस होता. सदर ऊसाची नोंद अगस्ती साखर कारखान्याकडे केली होती. हे म्हणणे खरे आहे की, ऊस तोडण्यापुर्वी तोडणीची नोटीस येते. आम्हाला ०१.०३.२०१३ रोजी नोटीस आली होती व दोन तारखेला तोड होणार होती. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या वर नमूद जमिनीत ऊस होता हे मी खोटे सांगत आहे.

५. घटना अंदाजे १० मिनीटे चालली असेल.

**प्रश्न –** आजुबाजूला शंकर गिते, दुटे, डेरे यांच्या वस्त्या आहेत ?

**उत्तर –** दुर आहेत.

**प्रश्न –** आजुबाजूला त्रयस्थ लोकांच्या जमिनी आहेत ?

**उत्तर –** हजार फुट अंतरावर आहेत.

घटनेच्या वेळी आरडाओरडा झाला होता.

प्रश्न – आजुबाजूचे किती लोक जमले होते ?

उत्तर – तेथे कोणीही नव्हते.

माझ्या डोक्यात काठी मारल्यामुळे व माझ्या चुलत्याच्या डोक्यात मारल्यामुळे रक्त आले होते व ते जमिनीवर पडले होते. माझ्या कपड्यावर रक्त पडले होते. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, मी माझे रक्ताने भरलेले कपडे पोलीस स्टेशनला जमा केले होते. माझे चुलत्याचे रक्ताने भरलेले कपडे पोलीस स्टेशनला दिले नव्हते. काठी व दगड आम्ही पोलीसांना दिला नाही. दगडाला व काठीला रक्त लागले होते किंवा नाही हे मी सांगू शकत नाही.

६. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक ०२.०३.२०१३ रोजी मारूती गोपाळ देशमुख याने रमेश सोपान देशमुख, मी, वसंत सोपान देशमुख, शंकर गोपाळ देशमुख, मंदा सुभाष देशमुख, मनिषा संतोष देशमुख, मनिषा विजय देशमुख यांचे विरूध्द फिर्याद दिली होती. आम्ही आरोपींचा ऊस पेटवून दिला व त्यांचे कुटूंबियांना मारहाण केली अशा आशयाचा फिर्याद मारूती देशमुख यांनी आमच्या विरूध्द दाखल केली आहे व त्याचा खटला या न्यायालयात चालू आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या प्रकरणात आमच्याकडून काठ्या व कु–हाडीचा दांडा जप्त केलेला आहे. आरोपी व त्याचे कुटुंबिय दिनांक ०२.०३.२०१३ ते दिनांक १४.०३.२०१३ पर्यंत बिबवे हॉस्पीटल येथे ॲडमीट होते किंवा नाही याची मला माहीती नाही. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०२.०३.२०१३ रोजी रमेश सोपान देशमुख, मी, वसंत सोपान देशमुख, शंकर गोपाळ देशमुख, मंदा सुभाष देशमुख, मनिषा संतोष देशमुख, मनिषा विजय देशमुख यांनी आरोपी व त्याचे कुटुंबियांना मारहाण केली होती व त्यांचा ऊस पेटून दिला होता.

**निशाणी ८२**

७. हे म्हणणे खरे नाही की, ''घटना दिनांक ०२.०३.२०१३ रोजी सकाळी १०:०० वाजता आमच्या शेतामध्ये घडली होती. आमच्या ऊसाला तोड आली होती. आरोपींनी रस्त्यात टाकलेल्या काट्या मी व माझे चुलते काढण्यासाठी गेलो होतो. त्यावेळी आरोपी म्हणाले की, काट्या काढायच्या नाही, या रस्त्याने ऊस न्यायचा नाही'' हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही त्यांना विनंती केली की, आमचा ऊस या रस्त्याने जाऊ द्या. त्यांनी ते मानले नाही. गणेश देशमुख याने माझ्या डोक्यात काठी मारली व सुभाष गोपाळ देशमुख यांच्या डोक्यात मारूती देशमुख यांनी दगड मारला. गणेश देशमुख याने माझ्या उजव्या मांडीला चावा घेतला व उषा मारूती देशमुख यांनी आम्हाला लाथाबुक्यांनी मारहाण केली व शिवीगाळ केली'' हे मी खोटे सांगत आहे. रमेश सोपानराव देशमुख याने मला उठवले ही बाब मी पोलीसांना जबाब देतेवेळी सांगितली होती. परंतु, सदरची बाब पोलीसांनी माझ्या जबाबात का नमूद केली नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. रमेश सोपान देशमुख हा आम्हाला अकोले येथे पोलीस स्टेशनला घेवून आला ही बाब जबाब देताना मी पोलीसांना सांगितली होती. परंतु, सदरची बाब पोलीसांनी माझ्या जबाबात का नमूद केली नाही याचे कारण मी सांगू शकत नाही.

८. हे मला माहीती नाही की, त्या दिवशी आरोपींच्या ८८/८९/४ मधील ऊस पेटलेला होता किंवा नाही. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या व आरोपींच्या जमिनी एकमेकांच्या लगत आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही आरोपींचा ऊस पेटवून दिला व ते कारवाई करतील म्हणून त्या कारवाईला शह देण्याकरीता सदरची खोटी फिर्याद दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी आम्हाला दगडाने, काठीने मारहाणही केली

नाही व चावाही घेतलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी व माझ्या चुलत्याने ठरवून खोटी फिर्याद दिली व आजरोजी खोटा जबाब देत आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

ANANT RADHAKISHAN TENGSE
Digitally signed by ANANT RADHAKISHAN TENGSE
Date: 2025.10.16 14:59:49 +0530

दिनांक १६.१०.२०२५
अकोले

**( अनंत रा. टेंगसे )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
कोर्ट नं. २, अकोले